सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १ जुलै २०२६

आतील पानावर

पान २– इक्कामध्ये सनी देओल अन् अक्षय
पान ३– 'गोलू' पुन्हा मोठ्या पडद्यावर!
पान ४– 'तृषाच्या विजयसोबतच्या नात्याची पुन्हा चर्चा
पान ५– प्रार्थनाचा मर्दिनी येणार भेटीला!
पान ७– श्वेता बच्चनला आवडायचा सलमान







# 'ईठा'चा शहारे आणणारा टीझर प्रदर्शित!

कलेवर प्रेम असणं म्हणजे काय हे आपल्याला 'ईठा'चा २ मिनिट ३ सेकंदाचा टीझर पाहून लक्षात येतं. पान में पान चखना हो तो मीठा, और तूफान को नाचते देखना हो तो ईठा टीझरमधल्या या लक्षवेधी टॅगलाइनवरूनच या सिनेमाचा संपूर्ण आशय लक्षात येतो. 'ईठा' सिनेमा महाराष्ट्राच्या लोककलेचा सुवर्णकाळ घडवणाऱ्या तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित आहे. विठाबाईंची भूमिका लोकप्रिय अभिनेत्री श्रद्धा कपूर साकारणार आहे. विठाबाईंची कलेवरील निष्ठा वाखाणण्याजोगी होती. एकदा एका प्रयोगादरम्यान, नऊ महिन्यांची गरोदर असताना प्रसूती वेदना होत असतानाही त्यांनी पडद्यामागे जाऊन बाळाला जन्म दिला. त्यानंतर काही मिनिटांतच त्या पुन्हा रंगमंचावर आल्या आणि त्यांनी आपली कला सादर केली. त्यांची ही संघर्षगाथा प्रेक्षकांना 'ईठा' सिनेमाच्या माध्यमातून पाहायला मिळेल. 'ईठा' सिनेमाचा जबरदस्त टीझर आता सगळ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून 'ईठा'च्या टीझरची सर्वत्र तुफान चर्चा रंगली होती. 'कॉकटेल २' चित्रपटासह 'ईठा'चा टीझर रिलीज करण्यात आला होता. 'ईठा'च्या २ मिनिट ३ सेकंदाच्या टीझरचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात येत आहे. विशेषतः श्रद्धा कपूरच्या अभिनयाने सर्वांची मनं जिंकून घेतली आहेत. या सिनेमाला अजय-अतुल यांनी संगीत दिलं आहे. याशिवाय लोकप्रिय मराठी लेखक-दिग्दर्शक क्षितिज पटवर्धन 'ईठा' चित्रपटाचा लेखक आहे. तर, लक्ष्मण उतेकरांनी 'ईठा'च्या दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे. यापूर्वी, लक्ष्मण उतेकरांच्या 'छावा' चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर भरभरून यश मिळालं होतं. आता त्यांचा 'ईठा' सिनेमा येत्या २८ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यामध्ये श्रद्धा कपूरसह रणदीप हुड्डा, नाना पाटेकर, अनंत जोशी, सिद्धार्थ जाधव यांसारख्या दमदार कलाकारांची मांदियाळी आहे. नेटकऱ्यांनी 'ईठा'च्या टीझरवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. श्रद्धाला या भूमिकेसाठी नॅशनल अवॉर्ड मिळेल, नॅशनल अवॉर्ड श्रद्धा, मॅडडॉक + श्रद्धा = ब्लॉकबस्टर, कमाल अभिनय, श्रद्धा कपूरने कमाल अभिनय केलाय, अजय अतुल आहेत. अजून काय हवं, श्रद्धा कपूर दिवसेंदिवस सगळ्या उत्तम भूमिका साकारतेय, लक्ष्मण उतेकर तुम्हाला सॅल्युट, हा सिनेमा १००० कोटींची कमाई करेल, अशा प्रतिक्रिया या टीझरवर आल्या आहेत. दरम्यान, २८ ऑगस्टला 'ईठा' सिनेमा संपूर्ण जगभरात प्रदर्शित होईल. आता हा सिनेमा बॉक्स



# ‘इक्का’मध्ये सनी देओल अन् अक्षय




सनी देओलचा एक चित्रपट लवकरच ओटीटीवर प्रदर्शित होणार असून यात त्याच्यासोबत अक्षय खन्ना दिसून येणार आहे. या चित्रपटाचे नाव 'इक्का असून याच्या माध्यमातून सनी देओल अन् अक्षय सुमारे २९ वर्षांनी एकत्र झळकणार आहेत. यापूर्वी दोघांनी १९९७ साली 'बॉर्डर चित्रपटात एकत्र काम केले होते.

इक्का हा चित्रपट थेट ओटीटीवर प्रदर्शित केला जाणार आहे. हा एक कोर्टरुम ड्रामा असून यात सनी देओल वकिलाच्या भूमिकेत तर अक्षय खन्ना आरोपीच्या पिंजऱ्यात दिसून येणार आहे. यात अक्षय हा नकारात्मक छटा असलेली भूमिका साकारत आहे. इक्का चित्रपट १० जुलै रोजी नेटफ्लिक्सवर स्ट्रीम केला जाणार आहे. या कोर्टरुम ड्रामामध्ये अक्षय अन् सनी देओल आमनेसामने असतील. अक्षय अन् सनी देओल यांच्यासोबत या चित्रपटात दीया मिर्झा, तिलोत्तमा शोम, संजीदा शैख आणि आकांक्षा रंजन कपूर आहे. चित्रपटात तिलोत्तमा शोम एका सरकारी वकिलाच्या भूमिकेत असून ती न्याय मिळवून देण्यासाठी पूर्णपणे प्रतिबद्ध आहे, तर दीया एक पत्नी अन् आईच्या भूमिकेत आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन सिद्धार्थ पी. मल्होत्राने केले आहे.




# इमरान हाश्मीची हॉरर चित्रपटात एन्ट्री

बॉलिवूडमध्ये गेली काही वर्षं वेगवेगळे भयपट बनले आणि प्रेक्षकांनी त्यांना चांगला प्रतिसाद दिला. 'स्त्री', 'रूही' अशा काही चित्रपटातून केलेला वेगळा प्रयत्न प्रेक्षकांनी उचलून धरला आहे. आता पुन्हा एक असाच भयपट प्रेक्षकांची झोप उडवायला सज्ज आहे. बहुप्रतिक्षित हॉरर 'रूह' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून अभिनेता इमरान हाश्मी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

गेल्या काही वर्षांत हॉरर चित्रपटांची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढली असून प्रेक्षकांकडून या प्रकारच्या चित्रपटांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. अशा परिस्थितीत इमरान हा नवा प्रोजेक्ट सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. इम्रान हाश्मी सध्या त्याच्या 'आवारापन-२' या आगामी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. जवळपास १८ वर्षांनंतर हा सीक्वल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.इमरान हाश्मीबॉलिवूडचा 'हॉरर किंग' म्हणून ओळखला जातो. 'राझ', 'राझ ३', 'एक थी डायन' आणि 'राझ: रिबूट' यांसारख्या हॉरर चित्रपटांमध्ये त्याने काम केलं आहे. एकीकडे इमरान त्याच्या 'आवारापन-२' या चित्रपटामुळे चर्चेत असताना त्याच्या 'रुह' या आगामी चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. 'रुह' या म्युझिकल हॉरर चित्रपटातून इमरान हाश्मी जवळपास ५ वर्षांनंतर हॉरर चित्रपटांच्या दुनियेत एन्ट्री घेत आहे. 'रुह' हा एक हाय-कॉन्सेप्ट म्युझिकल हॉरर चित्रपट आहे. यामध्ये इमरान हाश्मी मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन मयंक शर्मा करत आहेत. 'रुह' हा चित्रपट २०२७ मध्ये हिंदी, तमिळ आणि तेलुगू भाषांमध्ये चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल.



# कीर्तिचा ‘रफ्तार’ येणार भेटीला

राजकुमार राव आणि कीर्ति सुरेशचा चित्रपट 'रफ्तार'च्या निर्मात्यांनी आता याच्या प्रदर्शनाची नवी तारीख जाहीर केली आहे. रफ्तारच्या नव्या प्रदर्शन तारखेची घोषणा करताना राजकुमार रावने सोशल मीडियावर भावुक पोस्ट शेअर केली आहे. स्वप्न साकार करण्यास वेळ लागतो, 'रफ्तार' केवळ एक चित्रपट नाही, तर चित्रपटसृष्टीत आमचे पहिले पाऊल आहे असे राजकुमारने म्हटले आहे. कीर्तिचा हा चित्रपट दसऱ्याच्या आसपास १६ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट भारतात वेगाने वाढणाऱ्या एड-टेक उद्योग म्हणजेच ऑनलाइन शिक्षण पुरविणाऱ्या स्टार्टअप बिझनेस जगतावर आधारित आहे. यश मिळविण्यासाठी पूर्णपणे झोकून देणाऱ्या महिला अन् पुरुषाची ही कहाणी आहे. मोठी महत्त्वाकांक्षा, पैसा आणि सत्तेची भूक मानवी नाते, प्रेम आणि प्रामाणिकतेला कशाप्रकारे प्रभावित करते हे या चित्रपटात दाखविण्यात येणार आहे. 'रफ्तार' चित्रपटात राजकुमार आणि कीर्ति हे मुख्य भूमिकेत आहेत. तर अनुराग टाकूर, रोहन वर्मा, तान्या मानिकतला, रजत कपूर सहाय्यक भूमिकांमध्ये दिसून येतील. या चित्रपटाचे दिग्दर्शन आदित्य निंबाळकरने केले आहे. तर कहाणी रोहन नरुलाने लिहिली आहे. या चित्रपटाची निर्मिती राजकुमारची पत्नी पत्रलेखाकडून करण्यात आली आहे.

# श्रेयस अन् काजल पहिल्यांदाच दिसणार एकत्र



हिंदी सिनेसृष्टीत गेल्या काही दिवसांपासून 'द इंडिया स्टोरी' या चित्रपटाची सर्वत्र चर्चा आहे. या बहुचर्चित चित्रपटातील हिंदी व मराठी सिने- इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेता श्रेयस तळपदे तसेच अभिनेत्री काजल अग्रवाल पहिल्यांदाच एकत्र स्क्रिन शेअर करताना दिसणार आहेत. आता या चित्रपटाचं नवीन पोस्टर प्रदर्शित झालं आहे. त्यामुळे हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. नुकतंच 'द इंडिया स्टोरी'च्या निर्मात्यांनी चित्रपटाचं पहिलं अधिकृत पोस्टर प्रदर्शित केलं आहे. या नव्या पोस्टरमधून चित्रपटाच्या कथानकाची प्रभावी झलक समोर आली आहे. दरम्यान, 'द इंडिया स्टोरी' मध्ये काजल अग्रवाल एका वकिलाच्या भूमिकेत दिसत आहे, तर श्रेयस एका चिंताग्रस्त वडिलांच्या भूमिकेत झळकणार आहे. चित्रपटातील श्रेयसचा लूक हा चर्चेचा विषय ठरला आहे. 'द इंडिया स्टोरी' हा चित्रपट अन्नभेसळ आणि त्यासंबंधित गंभीर प्रश्नांवर आधारित एक प्रभावी कोर्टरूम ड्रामा असणार असल्याचं बोललं जात आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शनाची धुरा चेतन डीके यांच्या खांद्यावर कथा आणि निर्मितीची जबाबदारी सागर बी. शिंदे यांनी सांभाळली आहे. 'द इंडिया स्टोरी' २४ जुलै २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट हिंदी, तेलुगू आणि तमिळ भाषांमध्ये रिलीज केला जाणार असून त्याचे वितरण झी स्टुडिओज करणार आहेत. या पोस्टर प्रदर्शित झाल्यानंतर चित्रपटाबद्दल बोलताना दिग्दर्शक चेतन डीके म्हणाले, द इंडिया स्टोरी ही प्रत्येक त्या भारतीयाची कथा आहे, ज्यांच्या कुटुंबावर किंवा प्रियजनांवर अन्नभेसळीचा परिणाम झाला आहे. आपल्या समाजातील सर्वाधिक दुर्लक्षित, पण अत्यंत गंभीर समस्यांपैकी एका समस्येकडे हा चित्रपट लक्ष वेधतो. ही अशी समस्या आहे जी आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्येकावर परिणाम करते. या चित्रपटाच्या माध्यमातून या महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरू करायची होती. मला विश्वास आहे की या चित्रपटाचा प्रभावी संदेश लोकांचे डोळे उघडेल. 'द इंडिया स्टोरी' हा चित्रपट गंभीर पण अनेकदा दुर्लक्षित राहिलेल्या सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी एक असलेल्या अन्नभेसळीच्या प्रश्नावर प्रकाश टाकतो.

# 'गोलू' पुन्हा मोठ्या पडद्यावर!

ओटीटीवरील लोकप्रिय मालिकांपैकी एक असलेली 'मिर्झापूर' आता मोठ्या पडद्यावर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या मालिकेतील 'गोलू गुप्ता' हे पात्र साकारून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री श्वेता त्रिपाठी पुन्हा या भूमिकेत दिसणार आहे. याबाबत बोलताना ती खूपच भावूक झाली आणि तिने 'मिर्झापूर'शी जोडलेल्या अनेक आठवणी शेअर केल्या. श्वेतासाठी 'मिर्झापूर' ही फक्त एक वेब सिरीज नाही, तर तिच्या आयुष्याचा महत्वाचा भाग आहे. या मालिकेमुळे तिच्या करिअरला मोठी ओळख मिळाली. त्याचबरोबर तिला प्रेक्षकांचे प्रेम आणि पाठिंबाही मिळाला. 'मिर्झापूर द मूव्ही' ही आता मोठ्या पडद्यावर येणार आहे. या चित्रपटाची निर्मिती अमेझॉन एमजीएम स्टुडिओज आणि एक्सेल एंटरटेनमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने होत आहे. हा चित्रपट ४ सप्टेंबर रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचं दिग्दर्शन गुरमीत सिंग यांनी केलं असून कथा आणि लेखन पुनीत कृष्णा यांनी केलं आहे. निर्माते रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांनी या चित्रपटाची जबाबदारी सांभाळली आहे. निर्मात्यांच्या मते, ओटीटीवर प्रचंड लोकप्रिय ठरलेली ही कथा आता मोठ्या पडद्यावर अधिक भव्य स्वरूपात सादर केली जाणार आहे. श्वेता त्रिपाठीने सांगितलं की, 'मिर्झापूर'च्या टीमसोबत काम करताना जवळपास दहा वर्षांचा काळ पूर्ण होत आला आहे. या प्रवासाने तिला केवळ व्यावसायिक यश दिलं नाही, तर आयुष्यभरासाठी अनेक सुंदर नातीही दिली. तिने सांगितलं की, इतकी वर्षे एकत्र काम करताना कलाकार आणि तांत्रिक टीममधील सर्व सदस्य एका कुटुंबासारखे झाले आहेत. त्यांनी एकमेकांचे आनंद, दुःख, संघर्ष आणि यश एकत्र अनुभवले आहेत. श्वेताने आणखी एक महत्वाचा खुलासा केला. तिने सांगितलं की, 'मिर्झापूर-२' आणि 'मिर्झापूर-३'च्या चित्रीकरणादरम्यान ती मानसिकदृष्ट्या खूप कठीण काळातून गेली होती. 'गोलू गुप्ता' या पात्रामधील वेदना, राग आणि सूडाची भावना तिने इतक्या खोलवर अनुभवली की, त्याचा तिच्या वैयक्तिक आयुष्यावरही परिणाम झाला. ती म्हणाली की, त्या मानसिक अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी तिला बराच वेळ लागला. एखादं पात्र साकारताना त्याच्याशी खूप जास्त भावनिक नातं जोडल्यास त्याचा परिणाम कलाकारांवरही होऊ शकतो, असं तिने स्पष्ट केलं. दरम्यान, 'मिर्झापूर द मूव्ही'बद्दल चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. ओटीटीवर लोकप्रिय ठरलेली ही कथा आता मोठ्या पडद्यावर कशी सादर होणार, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. विशेषतः कालीन भैय्या, गुड्डू पंडित आणि गोलू गुप्ता यांसारखी लोकप्रिय पात्रं पुन्हा पाहण्यासाठी चाहते आतुर झाले आहेत. श्वेता त्रिपाठीसाठीही हा प्रकल्प खूप खास आहे. ती पुन्हा एकदा 'गोलू गुप्ता' बनून प्रेक्षकांसमोर येण्यासाठी सज्ज झाली आहे. त्यामुळे 'मिर्झापूर द मूव्ही' हा चित्रपट २०२६ मधील सर्वाधिक चर्चेत असलेल्या चित्रपटांपैकी एक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# करिना कपूर बनली 'लेडी सिंघम'

अभिनेत्री करीना कपूर आणि पृथ्वीराज सुकुमारन यांचा 'दायरा' सिनेमा भेटीला येणार आहे. मेघना गुलजार दिग्दर्शित या सिनेमाची करीनाच्या चाहत्यांना आधीपासूनच उत्सुकता आहे. काही महिन्यांपूर्वीच सिनेमाची घोषणा करण्यात आली होती. तर आता याची रिलीज डेटही जाहीर करण्यात आली आहे. तसंच सिनेमाच्या शूटमागील काही क्षण कॅमेऱ्यात टिपण्यात आले आहेत. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. करीना कपूरचा 'दायरा' सिनेमा चर्चेत आहे. सिनेमाच्या सेटवरील बीटीएस व्हिडीओ समोर आले आहेत. या व्हिडीओला प्रेक्षकांची पसंती मिळतेय. करीना आणि पृथ्वीराज पोलिसांच्या वर्दीत दिसत आहेत. यासोबत मेकर्सने चाहत्यांना एक सरप्राईजही दिलं आहे. सिनेमाच्या रिलीज डेटवरुन पडदा उठवण्यात आला आहे. १८ सप्टेंबर रोजी सिनेमा रिलीज होणार आहे. हे कळताच चाहत्यांच्या आनंदाला पारावर राहिलेला नाही. सिनेमात करीना लेडी पोलिस ऑफिसर आहे. सिनेमा सत्य घटनेवर आधारित आहे. यश केसवावी, सीमा अग्रवाल आणि मेघना गुलजार यांनी मिळून सिनेमाची कथा लिहिली आहे. करीना आणि पृथ्वीराज पहिल्यांदाच एकत्र झळकणार आहेत. 'दायरा' हा एक सस्पेन्स थ्रिलर सिनेमा असणार आहे.



# यशच्या 'टॉक्सिक'ची रिलीज डेट जाहीर

अभिनेता यशच्या 'टॉक्सिक' या बहुप्रतिक्षित चित्रपटाची अपडेट समोर आली आहे. या चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. आता अखेर चित्रपटाची नवी अधिकृत रिलीज डेट जाहीर करण्यात आली आहे. 'टॉक्सिक' हा चित्रपट २६ ऑगस्ट रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

सोबतच, मेकर्सनी या चित्रपटातील यशचा डबल रोल लुकही शेअर केले आहे. यशने 'टॉक्सिक'ची रिलीज डेट आणि नवीन पोस्टर शेअर करत लिहिले आहे, 'आपल्या वडिलांचा आदर करा'. यशने हे पोस्टर 'फादर्स डे'च्या मुहूर्तावर रिलीज केले आहे. हे पोस्टर पाहून चाहते कमालीचे उत्सुक झाले असून ते आता चित्रपटाच्या रिलीजची आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटात यशसोबत कियारा अडवाणी, हुमा कुरेशी, अक्षय ओबेरॉय, तारा सुतारिया, टोविनो थॉमस, नयनतारा, रुक्मिणी वसंत आणि सुदेव नायर हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. 'टॉक्सिक'चे दिग्दर्शन गीतू मोहनदास यांनी केले आहे. 'टॉक्सिक'च्या प्रदर्शनासोबतच बॉक्स ऑफिसवर आणखी एक मोठा संघर्ष पाहायला मिळणार आहे. अभिनेत्री श्रद्धा कपूर हिचा आगामी 'ईठा' हा चित्रपट २८ ऑगस्ट २०२६ रोजी म्हणजेच 'टॉक्सिक'च्या प्रदर्शनानंतर अवघ्या दोन दिवसांनी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची रिलीज डेट यापूर्वी अनेकवेळा बदलण्यात आली. सुरुवातीला हा चित्रपट १० एप्रिल २०२५ रोजी रिलीज होणार होता, त्यानंतर तो १९ मार्च २०२६ ला रिलीज करणार असल्याचे सांगितले. परंतु, मेकर्सनी पुन्हा बदल करत ही तारीख ४ जून २०२६ अशी केली होती. अखेर आता या चित्रपटाची नवी तारीख जाहीर करण्यात आली आहे.





# विस्कटलेली घडी पुन्हा बसल्याची चर्चा!

बॉलिवूड अभिनेता विजय वर्मा आणि अभिनेत्री तमन्ना भाटिया हे दोघेही एकमेकांना दोन वर्षांपासून डेट करत होते. मात्र, २०२५ मध्ये त्यांनी नात्याचा शेवट करत एकमेकांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले होते. आता पुन्हा एकदा दोघेही चर्चेत आले आहेत. याला कारण ठरलाय तो सोशल मीडियावर व्हायरल होणारा एक व्हिडिओ. या व्हिडिओतून दोघांचे सूत पुन्हा जुळले असून त्यांचे पॅचअप झाल्याचे म्हटले जात आहे. व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये विजय वर्मा आणि तमन्ना एकत्र दिसत आहेत. दोघेही हातात हात घालून चालताना दिसत असून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे. दोघेही चालत असताना एक गाडी समोर येते. या गाडीत दोघेही बसतात आणि निघून जातात. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर चाहत्यांमध्ये दोघे पुन्हा एकत्र आले आहेत का, असा सवाल विचारला जात आहे. मात्र, या चर्चांवर दोघांकडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नाही. दरम्यान, हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच चाहत्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. काहींनी दोघांच्या पुनर्मिलनाबाबत उत्सुकता व्यक्त केली, तर अनेकांनी ते पुन्हा एकत्र आले असतील तर आनंदच असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. काही चाहत्यांनी हार्ट आणि लव्ह इमोजीद्वारेही आपली भावना व्यक्त केली. विजय आणि तमन्ना यांनी दोन वर्षे एकमेकांना डेट केले होते. मात्र, मार्च २०२५ मध्ये त्यांनी परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आली होती. त्यांच्या विभक्त होण्यामागील नेमके कारण मात्र कधीच उघड झाले नाही. अशातच ब्रेकअपनंतर दोघे एकत्र दिसल्याने त्यांच्या नात्याबाबतच्या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले आहे. अभिनेत्री तमन्ना भाटियासोबत ब्रेकअप झाल्यानंतर विजय एका 'मिस्ट्री गर्ल'सोबत देखील स्पॉट झाला होता. त्यामुळे चाहत्यांमध्ये कुतूहल निर्माण झाले होते. मुंबईतील एका रेस्टॉरंटच्या बाहेर विजयला आलिया कुरैशीसोबत पाहण्यात आले. दोघेही एकत्र वेळ घालवत असल्याचे दिसून आले, त्यामुळे सोशल मीडियावर लगेचच त्यांच्या नात्याबाबत चर्चा सुरू झाली. विजय वर्माच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर तो 'मटका किंग' या वेबसिरीजमध्ये मुख्य भूमिकेत दिसला. या सिरीजला चांगला प्रतिसाद प्रेक्षकांनी आणि विजयच्या चाहत्यांनी दिला. त्याच्यासोबत या सिरीजमधील अनेक कलाकारांचा अभिनय लक्ष वेधून घेणारा आहे. वेबसिरीजची कथा १९६० च्या दशकातील मुंबईवर आधारित असून मटका जुगाराच्या पार्श्वभूमीवर उभी आहे.



# तृषाच्या विजयसोबतच्या नात्याची पुन्हा चर्चा

अलिकडच्या तमिळ चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री तृषा कृष्णन हिने तमिळनाडूचे मुख्यमंत्री आणि अभिनेता विजय यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत सोशल मीडियावर एक खास पोस्ट शेअर केली आहे. या एका पोस्टमुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या त्यांच्या नात्यात दुरावा आल्याच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. वाढदिवसानंतर एका दिवसाने तृषाने इंस्टाग्रामवर एक खास फोटो शेअर केला. या फोटोत विजय केक कापताना दिसत आहेत, तर तृषा त्यांच्याकडे प्रेमाने पाहताना दिसते. या फोटोसोबत तिने एक भावनिक संदेशही लिहिला. तिने कॅप्शनमध्ये लिहिले, त्या व्यक्तीला वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा, ज्याच्यामुळे प्रत्येक गोष्ट अधिक खास वाटते. तिच्या या पोस्टनंतर चाहत्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिक्रिया देण्यास सुरवात केली. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर तृषाने विजयला इंस्टाग्रामवर अनफॉलो केल्याच्या चर्चा सुरू होत्या. काही चाहत्यांनी तिच्या फॉलोइंग यादीत विजयचे नाव दिसत नसल्याने वेगवेगळे अंदाज बांधले होते. त्याचबरोबर वाढदिवशी शुभेच्छा न दिल्यानेही या चर्चांना आणखी हवा मिळाली होती. मात्र, आता तृषाच्या पोस्टनंतर या सर्व अफवा चुकीच्या असल्याचे अनेकांचे मत आहे. चाहत्यांनीही या पोस्टचे स्वागत करत दोघांमधील मैत्री आणि जवळीक अजूनही कायम असल्याचे म्हटले आहे. तृषा आणि विजय यांच्या नात्याबाबत अनेक वर्षांपासून चर्चा होत असतात. दोघे अनेक कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसतात. मात्र, त्यांनी कधीही त्यांच्या नात्याबाबत अधिकृतपणे कोणतेही वक्तव्य केलेले नाही. त्यामुळे त्यांच्याबद्दलच्या चर्चा केवळ अंदाजांवर आधारित असतात. काही दिवसांपूर्वी विजय यांच्या शपथविधी सोहळ्यातही तृषा उपस्थित होती. त्या वेळी ती भावूक झाल्याचे अनेकांनी पाहिले होते. त्यामुळे त्यांच्या नात्याबाबत पुन्हा चर्चा रंगल्या होत्या. दरम्यान, काही माध्यमांमध्ये विजय यांच्या वैयक्तिक आयुष्याबाबतही अनेक बातम्या समोर येत आहेत. मात्र, अशा वैयक्तिक गोष्टींबाबत अधिकृत माहिती आलेली नाही. कामाच्या आघाडीवर बोलायचे झाले तर तृषा नुकतीच अभिनेता सूर्यासोबत 'करुप्पु' या चित्रपटात दिसली होती. तर मुख्यमंत्रीपद स्वीकारण्यापूर्वी विजय यांचा 'जन नायकन' हा चित्रपट प्रदर्शित होणार असल्याची चर्चा होती. मात्र, त्याच्या प्रदर्शनाबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. तृषाच्या एका साध्या पण भावनिक पोस्टने सोशल मीडियावरील सर्व चर्चांना नवे वळण दिले आहे. आता चाहते या दोघांकडून पुढे आणखी काही खास क्षण पाहायला मिळतील का, याची उत्सुकतेने वाट पाहत आहेत.

# ‘आऊट ऑफ सिलॅबस’चा दमदार ट्रेलर रिलीज




मराठी सिनेसृष्टीत सध्या ‘आऊट ऑफ सिलॅबस’ या चित्रपटाची चर्चा आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. निर्माते डॉ. सुगत ग्यानेश्वर वाघमारे यांच्या ‘अद्-तिशू प्रॉडक्शन्स अँड म्युझिक’ यांची निर्मिती असलेल्या या आगामी मराठी चित्रपटाचा बहुप्रतीक्षित ट्रेलर प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आहे. पुस्तकांच्या चौकटीपलीकडे जाऊन आयुष्याचे खरे धडे शिकवणाऱ्या एका प्रेरणादायी प्रवासाची झलक यातून प्रेक्षकांना पाहायला मिळत आहे. टेंबूरखेड या छोट्याशा गावातील काही तरुणांच्या आयुष्याभोवती फिरणारी ही कथा आहे. सरकारी अधिकारी होण्याचे स्वप्न डोळ्यांत साठवून चझडउ परीक्षेची तयारी करणाऱ्या या तरुणांना वाटत असते की, पुस्तकांमध्ये असलेली उत्तरेच आयुष्याचे सर्व प्रश्न सोडवतील. मात्र, नियती त्यांच्या समोर असा एक गंभीर विषय आणून उभा करते, ज्याकडे समाज आणि व्यवस्था दोघांनीही दुर्लक्ष केलेले असते. हा ‘आऊट ऑफ सिलॅबस’ विषय त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनतो आणि तेथून सुरू होतो त्यांच्या संघर्षाचा खरा प्रवास. निसर्गसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारत हे तरुण जीवनाच्या खऱ्या परीक्षेत स्वतःला कसे सिद्ध करतात, याची थरारक आणि प्रेरणादायी मांडणी या चित्रपटातून करण्यात आली आहे. डॉ. सुगत ग्यानेश्वर वाघमारे यांनी ‘अद्- तिशू प्रॉडक्शन्स अँड म्युझिक’च्या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती केली असून, लेखक अनिकेत कोरडे यांच्या लेखणीतून साकारलेल्या या कथेला दिग्दर्शक नवीन देशबोनिया यांनी प्रभावीपणे पडद्यावर आणले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा नाविन्यपूर्ण वापर करत सचिन मनोहरराव ढोकणे यांनी ‘एआय क्रिएटिव्ह डायरेक्टर’ म्हणून महत्त्वाची जबाबदारी पार पाडली आहे. चित्रपटाच्या संगीताची धुरा मोहित कुलकर्णी यांनी सांभाळली असून, वैशाली सामंत, अभय जोधपूरकर आणि गोपाळ गावंडे यांच्या सुमधुर आवाजाने गीतांना विशेष रंग चढला आहे. मनीष केदार व्यास आणि सुधीर वड्डेली यांनी छायांकनाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली असून, संकलन अनिल विठ्ठल थोरात यांचे आहे. चित्रपटात अजिंक्य राऊत, अद्वयी आणि शेषपाल गणवीर हे प्रमुख भूमिकांमध्ये झळकणार असून, त्यांना सानिका तोरस्कर, अभिजित रामचंद्र, मिलिंद शिंदे आणि कमलेश सावंत यांची प्रभावी साथ लाभली आहे. ३ जुलैला हा चित्रपट रिलीज होणार आहे.

# कार्तिकसोबत दिसणार मराठी अभिनेत्री?

बॉलिवूडचा 'चंदू चॅम्पियन' कार्तिक आर्यन आगामी सिनेमाच्या तयारित आहे. दिग्दर्शक लव रंजनच्या सिनेमात तो मुख्य भूमिकेत दिसणार आहे. कार्तिकने लव रंजनच्या दिग्दर्शनाखाली या आधीही काम केलं आहे. आता लव रंजनच्या आगामी सिनेमात कार्तिक सोबत एका मराठी अभिनेत्रीची वर्णी लागल्याची चर्चा आहे. कोण आहे ही अभिनेत्री? कार्तिक आर्यन आणि लव रंजनच्या सिनेमासाठी मुख्य अभिनेत्रींचं कास्टिंग सुरु आहे. दरम्यान सध्या चर्चेत असलेल्या आणि बॉलिवूड गाजवणाऱ्या एका मराठी कुटुंबातल्या अभिनेत्रीचं नाव स्पर्धेत आहे. ही अभिनेत्री आहे शर्वरी वाघ. शर्वरीचा एकीकडे 'मै वापस आउंगा' सिनेमा रिलीज झाला आहे. तर दुसरीकडे ती वायआरएफच्या स्पाय युनिव्हर्समधील 'अल्फा' सिनेमामुळे चर्चेत आहे. यात ती आलिया भटसोबत दमदार ॲक्शन करताना दिसणार आहे. पुढच्या महिन्यात हा सिनेमा रिलीज होणार आहे. याशिवाय शर्वरी सूरज बडजात्या यांच्या 'ये प्रेम मोल लिया' सिनेमात आयुषमानसोबत दिसणार आहे. त्यातच आता कार्तिकसोबतच्या सिनेमामुळे तिचा भाव आणखी वाढल्याचं दिसत आहे. कार्तिक आर्यन लवकरच या रोमकॉम सिनेमाचं शूट सुरु करणार आहे. जर यामध्ये शर्वरी फायनल झाली तर कार्तिक- शर्वरीची फ्रेश जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येईल. शर्वरीनेही सिनेमात रस दाखवला आहे. सध्या लव रंजन स्क्रिप्टवर काम करत आहेत. यानंतर स्टारकास्टला सिनेमाची कथा सांगण्यात येणार आहे. कार्तिक आर्यन शेवटचा 'तू मेरी मै तेरा मै तेरा तू मेरी' सिनेमात दिसला. यामध्ये त्याच्यासोबत अनन्या पांडे होती. तसंच त्याच्या 'नागझिला' सिनेमाचाही पोस्टर लूक समोर आला होता. याशिवाय अनुराग बसूंच्या सिनेमात तो श्रीलीलासोबत दिसणार आहे.





# प्रार्थनाचा ‘मर्दिनी’ येणार भेटीला!

गेल्या काही दिवसात मराठीतील अनेक सिनेमे प्रेक्षकांच्या पसंतीस पडत आहेत. 'क्रांतीज्योती विद्यालय' ते आता 'तुंबाडची मंजुळा'पर्यंत आलेल्या सर्वच मराठी सिनेमांची खूप चर्चा झाली. प्रार्थना बेहेरेच्या आगामी 'मर्दिनी' सिनेमानेही उत्सुकता निर्माण केली आहे. पुढील महिन्यात सिनेमा रिलीज होणार असून नुकताच याचा ट्रेलर समोर आला आहे. यात प्रार्थनाचं कधीही न पाहिलेलं रौद्र रुप दिसत आहे. सिनेमाचा ट्रेलर खिळवून ठेवणारा आहे. 'मर्दिनी'चा २ मिनीट २० सेकंदांचा ट्रेलर रिलीज झाला आहे. यात प्रार्थना आणि मायरा ही मायलेकीची जोडी परत आली आहे. ही एका सिंगल मदरची गोष्ट आहे. सुरुवातीला प्रार्थना साध्या झुरळालाही घाबरत असते. पण नंतर जेव्हा तिच्या लेकीवर संकट येतं तेव्हा मात्र ती रौद्र रुप धारण करते. लेकीला वाचवण्यासाठी ती कोणत्याही थराला जाते. पोलिसांनाही वळणावर आणायला घाबरत नाही. शेवटी शत्रूसमोर ती मर्दिनी बनते. 'आई तारी तिला कोण मारी, पण ज्याला आई मारी त्याला कोण तारी...उठ, हरामखोर' हा तिचा शेवटचा डायलॉग अंगावर काटा आणणारा आहे. अभिजीत खांडकेकर आणि जितेंद्र जोशी पोलिसांच्या भूमिकेत दिसत आहेत. श्रेयस तळपदे प्रस्तुत, फ्लुएन्स मोशन पिक्चर्स आणि ओ डी आय ग्रुप निर्मित 'मर्दिनी' हा चित्रपट स्त्रीच्या अस्तित्वाचा, तिच्या आत्मसन्मानाचा आणि संघर्षातून उभ्या राहिलेल्या सामर्थ्याचा प्रवास उलगडणारा आशयघन सिनेमा आहे. समाजाने आखून दिलेल्या मर्यादांना आव्हान देत स्वतःची ओळख निर्माण करणार्या स्त्रीची प्रेरणादायी कहाणी या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहे. चित्रपटात प्रार्थना बेहेरे, अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी, राजेश भोसले आणि बालकलाकार मायरा वायकुळ यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन अजय मयेकर यांनी केले असून, निर्मिती दिप्ती तळपदे यांची आहे. सहनिर्माती टिना राकेश कोठारी आहेत. छायांकन शब्बीर नाईक, संकलन अभिषेक शेठ, संगीत हितेश मोडक तसेच पटकथा आणि संवाद महाबळेश्वर नार्वेकर यांनी चित्रपटाच्या तांत्रिक बाजूला सक्षम आधार दिला आहे. 'मर्दिनी' येत्या ३ जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे.

# 'सिधी सी बात ना मिर्च मसाला...' फाळके पुरस्काराचे मानकरी

## मन्ना डे



**१ मे १९१९ रोजी प्रबोधचंद्र डे या स्वरगंधर्वाचा जन्मकलकत्ता येथे झाला. त्यांचे काका तत्कालीन महान बंगाली गायक के. सी. डे यांच्या तालमीत शास्त्रीय संगीतात तरबेज झाले. त्यांनी हिंदी चित्रपटात ३५०० च्यावर व इतर भाषांमध्ये मिळून ४००० च्या वर गाणी गायलीत. २००६ साली 'उमर' चित्रपटातील 'दुनियावालों को नही कुछ भी खबर' हे शेवटले गाणे होते. आपल्या स्वरांची मशाल ६४ वर्षे तेवत ठेवत त्यांनी चित्रपटसृष्टी झगमगाटून टाकली.**

धरती कहे पुकार के। बीज बिछा ले प्यार के। मौसमबीता जाय...मन्ना डे यांच्या गायकीला निसर्ग तसेच सौंदर्यतत्त्वाचा स्पर्श होता. गाण्यातील बारीकसारीक अंगप्रत्यंगातून तो प्रतीत होत असे.'भाई रेऽऽ गंगा और जमुना की गहेरी है धारा....'आसमंतात स्वर मिसळून खुल्यामध्ये हे स्वरचित्र रेखाटून मन्नादांनी १९५३ सालच्या 'दो बिघा जमीन' चित्रपटातील पडद्यावरील हा प्रसंग नैसर्गिक केला आहे. मुख्य पात्राव्यतिरिक्त यात लता व मन्ना डे यांचे एक समूहगान समाविष्ट केले आहे.'तेरे बिना आग ये चांदनी। तू आ जाऽऽ' १९५१ चा 'आवारा' राज कपूर स्वप्नात बघतात. सुरुवातीच्या विलंबित इन्ट्रा प्रील्यूड म्युझिकच्या प्रभावात नरगिस दुःखी अवस्थेत लता यांचे वरील विलापी गाणे म्हणत येताना दिसतात. मन्ना डे यांच्या आर्त स्वरात साथ देतात.'ये नही, ये नही.. है जिंदगी। जिंदगी की इस चिता मे। जिंदा जल रहा हूँ मै...'

मन्ना डे यांच्या प्रासंगिक झपाटलेल्या स्वरात राज कपूरचा प्रवेश होतो. भयभीत व उद्विग्न अवस्थेत मन्ना यांचा सूर 'मुझको ये न रत्न चाहिए... मुझको चाहिये बहार...' हे ऐतिहासिक गाणे लता, मन्ना डे तसेच संगीतकार शंकर- जयकिशन यांनी अतिशय कला गतीने सादर करून राज कपूर या दिग्दर्शकाचे स्वप्न साकार केले.'लपक झपक तू, आ रे बदरवा...' (बुटपॉलिश- १९५३), तुरुंगात खितपत पडलेले सात गंजे कैदी. त्यांचे प्रमुख ज्येष्ठ कलाकार डेव्हिड यांच्यावर वरवर हास्य प्रदान करणारे मेघमल्हार रागातील हे अफलातून गाणे मन्ना डे यांच्या गायकी कंठातून प्रसृत झाले. या सर्वांची एक जादू म्हणजे हे अभिनव पद्धतीचे गाणे. खरे तर हे हास्य गीत नाही. कैद्यांच्या करुण अवस्थेतील विडंबन, विनोदाची पेरणी करून सादर केले.

'ऋतु आये, ऋतु जाये, सखी री। मन के मीत न आये...'भारतीय हिंदी सिनेमात ऋतुगीतांचा समावेश बहुतेक अनिल विश्वास यांनी १९५३ च्या 'हमदर्द' चित्रपटात या गाण्याद्वारे केला असावा व ऋतुगीत गाण्याचा मान सर्वप्रथम लता व मन्ना डे यांना मिळाला. गौड सारंग, गौड मल्हार, जोगीया व बहार रागांची वीण मातब्बर संगीतकार अनिल विश्वास यांनी लता व मन्ना डे यांच्या शास्त्रीय स्वरात कुशलतेने विणून हे गीत सादर केले. मन्ना डे व लता यांनी चारही रागातील बदलते भाव अद्वितीय कलात्मकतेने गाऊन प्रख्यात गायकीच्या संसाराचेच जणू दर्शन घडविले.

'प्यार हुवा इकरार हुवा है...' लता यांचा कोकिळ सूर व मन्ना डे यांचा गंधर्व सूर एकत्र करून हे आयकॉनिक युगल गीत १९५५ च्या 'श्री ४२०' चित्रपटात शंकर- जयकिशन साजात सजलेला एक अनमोल दागिनाच आहे. बरसात सुरू झाली, राज व नरगिस फूटपाथवर फिरताना छत्री उघडून आसरा घेतात. संगीताच्या सुरेल स्वरावर स्वार होऊन मन्ना डे यांचे मधुर स्वर कानी पडतात व गाणे सुरू होते. प्यार शब्द हजार वेळा गाण्यातून ऐकला असेल, पण या गाण्यात मन्ना डे यांच्या स्वर भांडारातले माधुर्य घेऊन आला. सिनेसंगीतातील केवळ तीन मिनिटांच्या गाण्यातील प्रत्येक स्वर प्रेक्षकाच्या भावना व चित्तवृत्ती जागवितात. हे स्वर सतत कानात गुंजारव करतात. 'ये रात भीगी भीगी...' (चोरी चोरी-१९५६) शंकर-जयकिशन या जोडीने मन्ना डे व लता यांना घेऊन मधुर युगल गीतांचा खजिनाच या चित्रपटात मोकळा केला. राज कपूरसाठी मन्ना डे यांचा आवाज घेऊन स्वतःला रत्नपारखी सिद्ध केले.'नैन मिले चैन कहाँ । दिल है वही तू है कहाँ' (बसंत बहार- १९५६)शंकर-जयकिशन जोडीने मन्ना डे यांच्या शास्त्रीय गाण कलाबाजीचा तसेच प्रणयी स्वरांचा खुबीने उपयोग करून हा संगीतावर रचलेला चित्रपट सूरमयी केला.'लागा चुनरी मे दाग छुपाऊ कैसे....' (दिल ही तो है-१९६३)रोशन यांच्या अप्रतिमसंगीतात न्हावून निघालेली मन्ना डे यांच्या स्वरात सजलेली वरील भैरवी राज कपूर यांनी पडद्यावर अक्षरशः आळवली.

मन्ना डे या महान गायकाने स्वरलयींचा सुप्रमाणित वापर करून तसेच लयीतील सूक्ष्मपणा साधत रागाची राणी भैरवीला खरोखरच राज्ञीपद बहाल केले. साहिरच्या उदात्त शब्दाला 'हो गयी मै मोरी चुनरिया' या कडव्यात तर उदात्त शांत स्वरात कारुण्याच्या पांघरुणातही स्वरातील माधुर्य राखले. शेवटी दीर्घ तराण्याचा नजराणा पेश करून या गाण्याला शिरपेच चढवीला.

मे १९१९ रोजी प्रबोधचंद्र डे या स्वरगंधर्वाचा जन्मकलकत्ता येथे झाला. त्यांचे काका तत्कालीन महान बंगाली गायक के. सी. डे यांच्या तालमीत शास्त्रीय संगीतात तरबेज झाले. त्यांनी हिंदी चित्रपटात ३५०० च्यावर व इतर भाषांमध्ये मिळून ४००० च्या वर गाणी गायलीत. २००६ साली 'उमर' चित्रपटातील 'दुनियावालों को नही कुछ भी खबर' हे शेवटले गाणे होते. प्रसिद्ध कवी हरिवंशराय बच्चन यांच्या 'मधुशाला'तील काव्यछंदे भावसुरात गायलीत.२००७- दादासाहेब फाळके पुरस्कार. २००५- पद्मभूषण, १९७१- पद्मश्री. फिल्मफेअर पुरस्कार- ३ वेळा अशी त्यांची यशस्वी कारकीर्द राहिली. चित्रपटात आपले स्वतंत्र घराणे असणारे व आपल्या स्वरांची मशाल सतत ६४ वर्षे तेवत ठेवून चित्रपटसृष्टी झगमगाटून टाकणारे स्वरगंधर्व मन्ना डे यांचे स्वरपुष्प २४ ऑक्टोबर २०१३ रोजी कायमचे कोमेजले.

**रमेश पोफळी**

# रजनीकांत यांच्या 'धर्मन'चं पहिलं पोस्टर रिलीज

अभिनेता कमल हासन हे सुपरस्टार रजनीकांत यांच्या आगामी चित्रपटाची निर्मिती करणार आहेत, हे सर्वांनाच माहीत आहे. या चित्रपटाच्या दिग्दर्शकाबाबत बऱ्याच दिवसांपासून उलटसुलट चर्चा सुरू होत्या. सुरुवातीला काही नावांची घोषणा झाली होती, पण त्यानंतर अधिकृत अपडेट आली नव्हती. मात्र, अखेर आज कमल हासन यांनी घोषणा केली आहे की, अश्वथ मारिमुथू हे रजनीकांत यांच्या या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत.

कमल हासन यांनी रजनीकांत यांचे एक पोस्टर शेअर करत या चित्रपटाचे नाव 'धर्मन' असल्याचे जाहीर केले आहे. चित्रपटाच्या पोस्टरमध्ये रजनीकांत अत्यंत स्टायलिश लूकमध्ये दिसत आहेत. त्यांनी एका डॉक्टरासारखा पेहराव केला आहे. त्यांच्या हातातील ग्लोव्हजवर रक्ताचे डाग दिसत असून, हातात ऑपरेशन करायचं एक उपकरण देखील दिसत आहे. यावरून रजनीकांत चित्रपटात नक्की काय करणार आहेत, याचा अंदाज चाहते लावत आहेत.

चित्रपटाच्या या पहिल्या पोस्टरमुळे चाहत्यांमध्ये कमालीची उत्सुकता वाढली आहे. रजनीकांत यांनी नुकतेच 'जेलर २' चे शूटिंग पूर्ण केले आहे. तसेच, दिग्दर्शक नेल्सन दिलीपकुमार यांच्यासोबतही त्यांचा एक आगामी चित्रपट येत आहे, ज्यामध्ये रजनीकांत आणि कमल हासन दोघेही मुख्य भूमिकेत एकत्र दिसणार आहेत.

आता या नव्या 'धर्मन' चित्रपटाच्या घोषणेमुळे रजनीकांत यांच्या आगामी चित्रपटांबद्दल प्रेक्षकांच्या अपेक्षा आणखी उंचावल्या आहेत. तसेच या चित्रपटात रजनीकांत आणि कमल हासन एकत्र दिसणार की नाही, हे मात्र अद्याप गुलदस्त्यात आहे.



# मल्याळी चित्रपटात दिसणार बाबिल खान

अभिनेता इरफान खानचा पुत्र बाबिल हा मल्याळी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवणार आहे. त्याने स्वत:चा पहिला मल्याळी चित्रपट 'गांधी बाजार संडे मार्केट'चे चित्रिकरण सुरू केले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध फिल्ममेकर बाबू जनार्दन करत आहेत. या चित्रपटात अपर्णा बालमुरली, दीपक परंबोल, निखिल नायर, जॉनी एंटनी, जगदीश, सुधीर करमना, आथमिया राजन आणि जयशंकर हे कलाकार दिसून येणार आहेत.

मी नेहमीच मल्याळी चित्रपट आणि त्याच्या कहाणी मांडण्याच्या शैलीने प्रभावित राहिलो आहे. मल्याळी चित्रपटाने नेहमीच माझ्या मनात अत्यंत खास स्थान निर्माण केले आहे. येथे कहाण्या ज्या प्रामाणिकपणे, संवेदनशीलतेन आणि भावनात्मक खोलीसह मांडल्या जातात, ते वाखाणण्याजोगे आहे. सिलिगुडीत 'गांधी बाजार संडे मार्केट'चे चित्रिकरण सुरू करणे माझ्यासाठी अत्यंत रोमांचक आणि रचनात्मक असल्याचे बाबिलने म्हटले आहे. बाबिलने मागील काही वर्षांमध्ये स्वत:च्या भावनात्मक रुपात सशक्त अभिनयाच्या जोरावर स्वत:ची खास ओळख निर्माण केली आहे. तो यापूर्वी 'लॉगआउट' या चित्रपटात दिसून आला होता. याचबरोबर कला, फ्रायडे नाइट प्लॅन, द रेल्वे मॅन यासारख्या प्रोजेक्टमधील अभिनयासाठी त्याचे कौतुक झाले आहे.



# श्वेता बच्चनला आवडायचा सलमान



बॉलीवूड सुपरस्टार सलमान खान आणि ऐश्वर्या राय यांचं एकेकाळी अफेअर होतं. ते वेगळे होऊन दोन दशकांहून जास्त काळ झाला आहे, तरीही त्यांच्याबद्दल आजही चर्चा होत असते. नव्वदच्या दशकात सलमान अनेक बॉलीवूड अभिनेत्रींचा क्रश होता. यात अमिताभ बच्चन यांची लाडकी लेक श्वेताचाही समावेश होता. 'कॉफी विथ करण' शोमध्ये श्वेता बच्चनने स्वतः याचा खुलासा केला होता. श्वेताने सांगितले की, आई-वडिलांसोबत शूटिंग सेटवर जाताना तिला सलमान आवडू लागला होता. श्वेता बच्चनने फिल्म इंडस्ट्रीत करिअर केलं नाही. मात्र ती लाइमलाइटमध्ये असते. ती बॉलीवूड पार्ट्यांना आणि कार्यक्रमांना हजेरी लावत असते. करण जोहरसह इतर काही सेलिब्रिटी श्वेता बच्चनचे खूप जवळचे मित्र आहे.

श्वेता लहान असताना तिच्या आई-वडिलांबरोबर चित्रपटाच्या सेटवर जायची जिथे अनेक स्टार्स तिचे मित्र झाले. श्वेताला तरुण असताना सलमान खूप आवडायचा. श्वेता बच्चनने एकदा भाऊ अभिषेक बच्चनबरोबर करण जोहरच्या 'कॉफी विथ करण' शोमध्ये हजेरी लावली होती. या शोमध्ये तिने सलमान खानवर क्रश असल्याची कबुली दिली होती. श्वेता अनेकदा अमिताभ बच्चन आणि जया बच्चन यांच्याबरोबर शूटिंग सेटवर जायची, त्याचदरम्यान सलमान तिला आवडू लागला. करणने श्वेताला हॉटनेसनुसार काही अभिनेत्यांना रँक करण्यास सांगितलं होतं. याचं उत्तर देताना श्वेताने सर्वात आधी सलमान खानचं नाव घेतलं होतं. तिला सलमानचं इतकं वेड होतं की ती त्याची 'मैंने प्यार किया' मधील टोपी घालून झोपायची. ही टोपी श्वेतासाठी तिचा भाऊ अभिषेकने आणली होती.

दरम्यान, सलमान खान व ऐश्वर्या राय हे नात्यात येण्यापूर्वीच श्वेता बच्चन हिचं लग्न झालं होतं. १९९७ मध्ये निखिल नंदा व श्वेता बच्चन यांचं लग्न झालं व त्यांना नव्या नवेली नंदा व अगस्त्य नंदा ही दोन अपत्ये आहेत.

# तुम्हाला ठामपणे नकार देता आला पाहिजे!



दाक्षिणात्य सुपरस्टार राम चरण आणि अभिनेत्री जान्हवी कपूर यांची मुख्य भूमिका असलेला 'पेद्दी' हा चित्रपट सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. अलिकडेच ४ जूनला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. एकीकडे या चित्रपटाची कथा, कलाकारांचा अभिनय इतर गोष्टींचं कौतुक होताना दिसतंय. तर दुसरीकडे त्यातील काही दृश्यांवरून सोशल मीडियावर मोठा वाद निर्माण झाला आहे. विशेषतः जान्हवी कपूरच्या पात्राचं चित्रण आणि काही कॅमेरा अँगल्सवर अनेक प्रेक्षकांनी नाराजी व्यक्त केली. या वादात आता राष्ट्रीय पुरस्कार विजेती अभिनेत्री नित्या मेनन हिने उडी घेतली आहे. शिवाय या प्रकरणी तिने आपलं मत मांडलं असून तिच्या वक्तव्याची जोरदार चर्चा रंगली आहे.

नेमकं काय म्हणाली नित्या मेनन? नित्या मेनने मल्याळम, तेलुगू आणि तमिळ चित्रपटांमध्ये काम केलं आहे. तिने दुल्कर सलमान, धनुष, थलपथी विजय आणि बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार यांच्यासोबत देखील स्क्रीन शेअर केली आहे. दरम्यान, अलिकडेच दाक्षिणात्य अभिनेत्री नित्या मेननला 'पेद्दी'भोवती सुरू असलेल्या वादाबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर प्रतिक्रिया देताना तिने सांगितले की तिने अद्याप चित्रपट पाहिलेला नाही. त्यामुळे याबाबत थेट भाष्य करणं योग्य ठरणार नाही, असं तिने स्पष्ट केलं. एका मुलाखतीत तिने म्हटलं की, ही समस्या फक्त दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतच आहे असे म्हणणे चुकीचं ठरेल. अशा गोष्टी सगळीकडे होताना दिसत आहेत. या मुलाखतीत ती म्हणाली, मला वाटतं खरी समस्या हीच आहे की आजकाल चित्रपटांमधील प्रत्येक गोष्टीकडे आता व्यवसायाच्या दृष्टीने पाहिलं जातं. चित्रपट हिट करण्यासाठी प्रेक्षकांना जे काही आवडतं किंवा त्यांचे लक्ष वेधून घेतील, असं काहीतरी दाखवलं जातं. त्यानंतर अभिनेत्री पुढे म्हणाली, मला वाटत कोणत्याही कलाकाराने आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासूनच आपल्या तत्त्वांवर ठाम राहणं शिकलं पाहिजे. चित्रपटातील एखादा सीन किंवा सादरीकरण आपल्या तत्त्वांशी जुळत नसेल, तर त्याला तुम्ही थेट नकारही देऊ शकता. महिला कलाकार पूर्णपणे असहाय्य असतात, असं मला वाटत नाही. त्यांना स्वतःची भूमिका ठामपणे मांडता येते.जर तिला कोणताही सीन करताना असं वाटत असेल की आपला वापर फक्त लोकांना आकर्षित करण्यासाठी केला जात आहे, तर तुम्हाला ठामपणे नकार देता आला पाहिजे. असं मत तिने व्यक्त केलं. 'पेड्डी'वरील वाद हा केवळ एका चित्रपटापुरता मर्यादित राहिलेला नाही. भारतीय चित्रपटसृष्टीत महिलांचे चित्रण कसे असावे, कलाकारांची जबाबदारी काय असावी आणि निर्मात्यांनी कोणत्या मर्यादा पाळाव्यात, यावर पुन्हा एकदा व्यापक चर्चा सुरू झाली आहे.

बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंहने भारतीय चित्रपटसृष्टीत नवा इतिहास रचल्याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. अनेक वर्षे बॉक्स ऑफिसवर वर्चस्व गाजवणाऱ्या शाहरुख खान, रजनीकांत, प्रभास आणि अल्लू अर्जुन यांसारख्या सुपरस्टार्सना मागे टाकत रणवीर सिंह भारतातील सर्वाधिक मानधन घेणारा अभिनेता ठरल्याचं सांगितलं जात आहे.

एकेकाळी एखाद्या अभिनेत्याने एका चित्रपटासाठी एक कोटी रुपये मानधन घेणं ही मोठी गोष्ट मानली जात होती. मात्र, आता भारतीय चित्रपटसृष्टीत शेकडो कोटी रुपयांची कमाई करणारे कलाकार पाहायला मिळत आहेत. अहवालानुसार, रणवीर सिंहने तब्बल ३२५ कोटी रुपयांची कमाई करत नवा इतिहास रचला आहे. याआधी भारतातील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या कलाकारांमध्ये दक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांत यांचं नाव आघाडीवर होतं. त्यांनी

# रणवीर सर्वाधिक मानधन घेणारा अभिनेता




एका ब्लॉकबस्टर चित्रपटातून २५० कोटी रुपयांपेक्षा अधिक कमाई केल्याचं सांगितलं जात होतं. तसेच प्रभास आणि अल्लू अर्जुन यांसारख्या लोकप्रिय कलाकारांनीही त्यांच्या सुपरहिट चित्रपटांमधून सुमारे २०० कोटी रुपयांच्या आसपास कमाई केली होती. बॉलिवूडचा सुपरस्टार शाहरुख खान यानेदेखील जवळपास २०० कोटी रुपयांची कमाई केली होती. मात्र, रणवीर सिंहने या सर्व कलाकारांना मागे टाकत अव्वल स्थान पटकावलं आहे. या मोठ्या कमाईमागे त्याचा 'धुरंधर' हा चित्रपट असल्याचं सांगितलं जात आहे. एकंदरीत, रणवीर सिंहने केवळ अभिनयातच नव्हे तर व्यावसायिक दृष्टिकोनातूनही मोठी झेप घेतली आहे.

# सर्वांना आयुष्यात संघर्ष करावाच लागतो!

बॉलीवूड अभिनेत्री आलिया भट्ट ही आगामी 'अल्फा' चित्रपटामुळे चर्चेत आली आहे. या सिनेमाचा ट्रेलर लॉन्च झाला असून ती जोरदार प्रमोशन करत आहे. तिच्यासह या सिनेमात अभिनेत्री शर्वरी वाघदेखील झळकणार आहे. आलिया भट्ट ही १४ वर्षांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करीत असून तिचे चित्रपट सुपरहिट ठरले आहेत. मात्र अनेकदा तिला नेपोटिझमवरुन बोलले जाते. याबाबत आता आलियाने तिची भूमिका मांडली आहे. एका मुलाखतीमध्ये आलिया म्हणाली की, खरं सांगायचं तर, अनेक वर्षांपासून मी फक्त अभिनय करत आहे. लहानपणी आरशासमोर उभे राहून मी अभिनय करत होते. त्यावेळी माझ्या डोक्यामध्ये फक्त एकच विचार असायचा की, समोर जो टीव्ही आहे, एकदिवस मला या टीव्हीमध्ये झळकायचे आहे. आलियाला लहानपणापासून मनोरंजन क्षेत्राच्या दुनियेचे कुतूहल होते. सिनेविश्वात तिचे ध्येय असल्याचे तिला माहीत होते. ती फक्त अभिनेत्री होण्याच विचार करत असे. आलिया लहानपणापासून गोविंदा व करिश्मा कपूर यांची गाणी खूप मन लावून पाहत असे. चित्रपट, कॅमेरा आणि अभिनय तिला नेहमीच आकर्षित करायचे. आलियाने तिला अनेक संधी मिळाल्या असल्या तरी कठीण काळसुद्धा अनुभवला असल्याचे वक्तव्य केले आहे. आलिया भट्टने तिला इतरांपेक्षा अधिक संधी सहज मिळाल्याचे कबूल केले. ती म्हणाली की, माझा प्रवास हा नक्कीच इतरांपेक्षा वेगळा राहिला आहे. मला अनेकदा संधी मिळाल्या आहेत. पण याचा अर्थ असा होत नाही की आयुष्यात काहीच अडचणी किंवा संघर्ष येणार नाहीत. मी सुद्धा अनेकदा संघर्ष केला आहे. माझ्या वेगळ्या अडचणी होत्या. पण अशावेळी स्वतःवर विश्वास ठेवला पाहिजे. स्वप्न पाहण्याचा आणि पुढे जाण्याचा हक्क प्रत्येकाला आहे. त्यामुळे संघर्ष आला तरी त्यातून पुढे जाता आले पाहिजे. अभिनेत्री आलिया भट्ट हिचा 'अल्फा' चित्रपट ३ जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे. आलिया पहिल्यांदाच यशराज फिल्म्सच्या स्पाय युनिव्हर्समध्ये सामील झाली आहे. ती शर्वरी वाघसह दमदार ॲक्शन सीन करताना दिसणार





डेव्हिड धवन दिग्दर्शित 'है जवानी तो इश्क होना है' या चित्रपटात वरुण धवनच्या खोट्या आईची भूमिका साकारल्यानंतर अभिनेत्री मौनी रॉयला सोशल मीडियावर प्रचंड ट्रोल करण्यात आले होते. आता या टीकेवर तिने भाष्य करत आपल्यावर त्याचा कोणताही परिणाम होत नसल्याचे सांगितलं. या भूमिकेवरून खूप चर्चा झाली. निर्माते माझ्यासोबत असे कसे करू शकतात? असे प्रश्नही उपस्थित झाले. पण मला नेमकं काय करायचं आहे, हे माहीत होतं. माझे दिग्दर्शक आनंदी होते आणि चित्रपटातील सहकलाकारांनाही माझं काम आवडलं होतं. त्यामुळे लोकं काय म्हणतात याकडे मी फारसं लक्ष देत नाही आणि त्याची मला पर्वा नाही. अशा शब्दांत तिने टोलर्सना फटकारले. या भूमिकेची ऑफर मिळाल्याचा अनुभव सांगताना तिने खुलासा केला की, कास्टिंग डायरेक्टर मुकेश छाबरा यांनी सर्वप्रथम तिला याबाबत संपर्क साधला होता. जेव्हा मला वरुण धवनच्या आईची भूमिका असल्याचं सांगण्यात आलं, तेव्हा माझी पहिली प्रतिक्रिया होती 'काय? आईची भूमिका?' पण नंतर डेव्हिड धवन आणि संवाद लेखक फरहाद सामजी यांच्याकडून कथा ऐकल्यानंतर मी खूप हसले. संपूर्ण प्रसंगच इतका मजेशीर होता की ही भूमिका करण्यासाठी मी लगेच तयार झाले, अशाप्रकारे मौनीला भूमिका मिळाल्याचे तिने सांगितले. डेव्हिड धवन यांच्याबद्दल बोलताना मौनीने त्यांच्यावरील आदर व्यक्त केला. मी त्यांच्या चित्रपटांची खूप मोठी चाहती आहे. त्यांचे चित्रपट पाहिले की मन हलकं होतं. हा एक कॉमेडी चित्रपट होता आणि मला पहिल्यांदाच अशा प्रकारची भूमिका साकारण्याची संधी मिळत होती, असं ती म्हणाली. तिने पुढे सांगितले की, चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान तिला जाणीवपूर्वक चर्चेपासून दूर ठेवण्यात आले. त्यामुळे तिच्या भूमिकेबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली, जो चित्रपटाच्या दृष्टीने योग्य निर्णय ठरला. दरम्यान, 'है जवानी तो इश्क होना है' या चित्रपटात वरुण धवन, मृणाल ठाकूर आणि पूजा हेगडे प्रमुख भूमिकेत आहेत.

# मौनी रॉयला त्याची पर्वा नाही!